दैनिक मराठवाडा पत्र



# सेवा सुधारणांचा 150 दिवसांचा कार्यक्रम; 'सेवाकर्मी प्लस' मध्ये जि.प. छत्रपती संभाजीनगर राज्यात अव्वल

**● मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मानीत**

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या प्रशासनाला आधुनिक बनवतांनाच प्रशासनाला गति देण्यासाठी सेवाविषयक सुधारणांचा कार्यक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला होता. १५० दिवसांच्या या सुधारणा कार्यक्रमात 'सेवा कर्मी प्लस' या कार्यक्रमात जिल्हा परिषद छत्रपती



संभाजीनगर यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याबद्दल आज मुंबई येथे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सेवाविषयक प्रगतीचे मुल्यांकन करणे व सेवाविषयक बाबींच्या सुधारणांकरीता १५० दिवसांचा कार्यक्रम दि.६ मे ते दि.२ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आला. तथापि,राज्यातील पुरपरिस्थितीमुळे या कार्यक्रमास दि.१० जानेवारी२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

काय होते या कार्यक्रमात ?

या कार्यक्रमात प्रशासकीय सुधारणांमध्ये मनुष्यबळ विषयक बाबींवर लक्ष केंद्रीत करण्यात आले होते. त्यात कर्मचाऱ्यांच्या सेवाज्येष्ठता याद्या प्रसिध्द करणे, पदोन्नती करणे, बिंदुनामावली नोंदवही अद्ययावत करणे, अनुकंपा भरती, सरळसेवा भरती, केंद्र शासनाच्या ळत्रङ्ख्रढ पोर्टलवर नोंदणी तसेच ५ प्रशिक्षण कोर्स पूर्ण करणे व सेवापुस्तिका अद्ययावत करणे या बाबींचा समावेश होता.

जि.प. छत्रपती संभाजीनगरची सर्वोत्कृष्ट कामगिरी- या कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांच्या मार्गदर्शनाखाली उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) राघवेंद्र घोरपडे यांनी यशस्वी अंमलबजावणी केली. यामध्ये जिल्हा परिषद अंतर्गतच्या सर्व खाते प्रमुखांनी व त्यांच्या अधिनिस्त सर्व कर्मचाऱ्यांनी सहयोग दिला. त्यामुळे जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगरच्या कामकाजाचे शासनस्तरावरुन गुणांकन होऊन राज्यातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषदांमध्ये जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगरचा समावेश झाला. या अभियानांतर्गत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल आज मुंबई येथे सह्याद्री अतिथी गृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र प्रदान करुन सन्मानीत करण्यात आले.

## रोजगार मेळाव्यात ११० तरुणांना मिळाली नोकरी; धूत ट्रान्समिशनकडून २७ जणांना जागीच नियुक्तीपत्रे

जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यातील बेरोजगार तरुण-तरुणींसाठी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध करून देत, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि हुतात्मा जनार्दनमामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांनी ११० उमेदवारांची निवड केली असून, त्यांच्या करिअरला नवी दिशा मिळाली आहे. या मेळाव्याचे मुख्य आकर्षण ठरले ते छत्रपती संभाजीनगर येथील धूत ट्रान्समिशन प्रा. लि. हे औद्योगिक गृह. या कंपनीने २७ पात्र उमेदवारांना निवडीनंतर तात्काळ नियुक्तीपत्रे देऊन त्यांच्या उत्साहात भर घातली.

शुक्रवार दि.२७ मार्च रोजी शासकीय आयटीआय जालना येथे हा मेळावा पार पडला. सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. यावेळी शासकीय आयटीआयच्या प्राचार्या श्रीमती तृप्ती भोपे आणि उपप्राचार्या श्रीमती रजनी शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. या मेळाव्यात इयत्ता पाचवी ते दहावी, बारावी आणि आयटीआय (सर्व ट्रेड्स) उत्तीर्ण असलेल्या शेकडो उमेदवारांनी हजेरी लावली होती. मेळाव्यात एकूण ९ नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यामध्ये असिस्टंट मॅनेजर, ब्रांच मॅनेजर, कॅशियर, टेक्निशियन, ऑपरेटर, फील्ड एक्झिक्युटिव्ह, हेल्पर आणि ए.सी.सी. मशीन ऑपरेटर अशा विविध पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आली. एकूण ११० उमेदवारांना या माध्यमातून रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल परिहार यांनी केले, तर आभार प्रदर्शन एस. जी. चव्हाण यांनी केले. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी आयटीआयचे गटनिदेशक एस. एस. कापसे, ए. एस. धाबे, बी. डी. वाणी यांच्यासह कौशल्य विकास विभागातील भुजंग रिठे, अमोल बोरकर, आत्माराम दळवी, प्रदीप डोळे, योगेश बहुरे, नितीन लोकडे, कैलास काळे, रवींद्र पाडमुख, विशाल जगरवाल, दीपक पालवे आणि गणेश सुपारकर यांनी विशेष परिश्रम घेतले. असेही कळविले आहे.

## मिशन लक्षवेध अंतर्गत विभागीय प्रतिभा विकास केंद्रकरीता निवड चाचणी: पात्र खेळाडुंना अर्ज करण्याचे आवाहन

परभणी । प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्यमार्फत मिशन लक्ष्यवेध योजना ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेतंर्गत लॉन टेनिस आणि कुस्ती या क्रीडा प्रकाराकरीता विभागीय क्रीडा निपुणता केंद्र, विभागीय क्रीडा संकुल, छत्रपती संभाजीनगर येथे स्थापन करण्यात येणार आहे.

विभागीय क्रीडा निपुणता केंद्रस्तरावरील खेळाडू निवड चाचणीकरीता खेळनिहाय निकष बाबी पुढील प्रमाणे आहेत.

लॉन टेनिस -वयोमर्यादा- २५ वर्षा आतील मुले/मुली (त्या वर्षाच्या ३१ डिसेंबर रोजी), आवश्यक कागदपत्रे - जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, गत २ वर्षातील क्रीडा विषयक कामगिरीचे प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज फोटोग्राफ ०३, शाळा / महाविद्यालय बोनाफाईड प्रमाणपत्र, पालकाचे संमती पत्र इ. खेळाडू महाराष्ट्र राज्यातील असला पाहिजे.

क्रीडा कामगिरी विवरण - टॉप रँक प्लेयर्स इन एआयटीए, नॅशनल रँकिग प्लेयर्स, राज्यस्तरावरील पदक प्राप्त खेळाडू किंवा राष्ट्रीयस्तरावरील सहभागी खेळाडू (SGPI, AITA, Khelo India National Only). गत २ वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती चाचण्यांमध्ये पात्र होणे आवश्यक. शासन मान्यताप्राप्त डॉक्टराकडून दिलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य

कुस्ती - वयोमर्यादा - २५ वर्षो आतील मुले/मुली (त्या वर्षाच्या ३१ डिसेंबर रोजी)

आवश्यक कागदपत्रे - जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, गत २ वर्षातील क्रीडा विषयक कामगिरीचे प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज फोटोग्राफ ०३. शाळा / महाविद्यालय बोनाफाईड प्रमाणपत्र, पालकाचे संमती पत्र इ. खेळाडू महाराष्ट्र राज्यातील असला पाहिजे. क्रीडा कामगिरी विवरण - राज्यस्तरावरील पदक किवा राज्यस्तरावरील खेळाडू प्राप्त राष्ट्रीयस्तरावरील सहभागी खेळाडू (SOFI, WFI, Khelo india National Only) गत २ वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती (त्रीर्शीी) चाचण्यामध्ये पात्र होणे आवश्यक. शासन मान्यताप्राप्त डॉक्टराकडून दिलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य.

पात्र खेळाडूंनी आपले अर्ज संपूर्ण माहितीसह विहित नमुन्यात ऑफलाईन स्वरुपात या दि. ६ एप्रिल २०२६ पर्यन्त प्रत्यक्षात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, परभणी जिल्हा क्रीडा संकुल, स्टेशन रोड, परभणी येथे कार्यालयीन वेळेत सादर करावे. अधिक माहितीसाठी संपर्क -संजय मुंढे (राज्य क्रीडा मार्गदर्शक): ९४२२१७८००९, सुयश नाटकर (क्रीडा अधिकारी) :९७६३९९४८४६, रोहन औंढेकर (क्रीडा अधिकारी) : ८९९९३३७९२९, कल्याण पोले (तालुका क्रीडा अधिकारी): ९६७३७३२०७३. सदर विभागीयस्तरीय निवड चाचणी करीता जास्तीत जास्त खेळाडूंनी निवड चाचणीमध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे यांनी केले आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात गॅस एजन्सीधारक व सेल्स ऑफिसर्स यांच्यासोबत बैठक संपन्न गॅस वितरकांना महत्वाचे निर्देश ; प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन

नांदेड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील गॅस पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आणि ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली सर्व गॅस कंपन्यांचे सेल्स ऑफिसर्स आणि गॅस एजन्सी धारकांची महत्त्वाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत गॅस वितरकांना अत्यंत महत्त्वाचे निर्देश देण्यात आले आहे.

बैठकीतील महत्त्वाचे निर्णय आणि सूचना: होम डिलिव्हरी बंधनकारक: सर्व गॅस एजन्सी धारकांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत की, त्यांनी कोणत्याही परिस्थितीत ग्राहकांना एजन्सीवर बोलावून गॅस देऊ नये. ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर 'होम डिलिव्हरी' देणे बंधनकारक आहे.तसेच ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर 'होम डिलिव्हरी' साठी काही अडचण आल्यास त्यांनी त्यांच्या तालुक्यातील खालील प्रमाणे निरीक्षण अधिकारी ( नायब तहसीलदार पुरवठा ) यांचेशी संपर्क करावा.

संपर्क मो.क्रं.:- नांदेड-७०३०७७३०४०, अर्धापूर-८८०५०६८९५४, मुखेड- ९३५६८०६४०५, धर्माबाद- ९४२१८४१४४७,मुदखेड- ९४४५११२७८२,उमरी- ८८०५४४७८३७,बिलोली- ७६२०७७९७०६,लोहा- ९६५७२२४०४२,हिमायतनगर- ८३०८०७३०८९, हदगांव-८८०५०६८९५४, कंधार-९८२३७५७३४५, माहूर-९४०३१८४४७३, किनवट-९८५०२९६०९६, भोकर- ९४२११८३६०२, देगलूर- ९४२३८०५०६४,नायगांव- ७०५७००२८६५

# अजित दादा हे पुरोगामी विचाराचे पुरस्कर्ते होते: ॲड.उषा दराडे

**● अजित स्मृती व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प समर्पित**

बीड । प्रतिनिधी

स्व.यशवंतराव चव्हाण आणि युगपुरुष शरदचंद्र पवार यांचा वैचारीक वारसा पुढे चालवण्याचे काम अजित दादा पवार यांनी केले. शाहु-फुले-आंबेडकर यांचे पुरोगामी विचार आणि राज्य घटनेनुसार सार्वजनिक वर्तन हे अजित दादांच्या कार्यपध्दतीचे वैशिष्ट्य होते. प्रामुख्याने महिलांचा सन्मान करण्याची संस्कृती पवार कुटुंबाने वृध्दींगत केली.अजित दादांसारख्या नेतृत्वाची या राज्याला खर्या अर्थाने आज गरज असताना त्यांचे झालेले निधन ही फार मोठी हानी आहे. हा अपघात नव्हे तर घातपातच वाटतो. ज्यांनी कुणी हे घडवून आणले असेल त्यांना शिक्षा होण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे हीच दादांना खरी श्रध्दांजली ठरेल असे प्रतिपादन माजी आ.ॲड.उषाताई दराडे यांनी केले. अजित स्मृती व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प समर्पित करताना त्या बोलत होत्या.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने बीडमध्ये लोकनेते अजित दादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रत्येक महिन्याच्या २८ तारखेला व्याख्यानमालेच्या माध्यमातून स्मृतीदिन साजरा करण्यात येत आहे. २८ फेब्रुवारी रोजी समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण काका आखाडे यांच्या व्याख्यानाने सुरुवात झाली. काल २८ मार्च रोजी ॲड. उषाताई दराडे यांना निमंत्रीत करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड न.प.चे उपाध्यक्ष विनोद मुळूक हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, दै. सिटिझनचे संपादक शेख मुजीब,निमा डॉक्टर्स संघटनेचे अध्यक्ष डॉ.अजित जाधव , बीड न.प.चे स्वच्छता सभापती शेख निजाम,कल्याण काका आखाडे,सौ.प्रज्ञाताई खोसरे आदि मान्यवर उपस्थित होते. बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मानूरकर यांनी अजित दादांच्या जीवनावरील पुस्तक भेट देवून पाहुण्यांचे स्वागत केले.



या प्रसंगी बोलतांना ॲड. दराडे म्हणाल्या की, अजित दादा पवार यांची खरी ओळख कामाचा माणूस हीच होती. आपल्या राजकिय जीवनात त्यांनी किती जणांना वैयक्तीक आणि सार्वजनिक मदत केली असेल याची मोजदाद होवू शकत नाही.आज दादांच्या निधनानंतर देशभरातील असंख्य लोक हळहळ व्यक्त करत आहेत. माझ्या व्यक्तीगत जीवनात मला विधान परिषदेवर आमदार करण्यामध्ये,राज्य महिला आयोगावर सदस्य करण्यामध्ये अजित दादांचे फार मोठे योगदान होते. माझ्या व्यक्तीगत जीवनात सुध्दा एका संकटातून त्यांनी मला बाहेर काढले होते. जेव्हा अजित दादा हे पवार साहेबांना सोडून दुसर्या मार्गाने गेले तेव्हा मी त्यांची राजकिय विरोधक म्हणून अनेकदा टिका केली. परंतु या टिकेला माझ्या घरातूनच माझ्या मुली विरोध करत होत्या. यावरुन दादांची लोकप्रियता लक्षात येते. आर.आर.पाटील, दिलीप वळसे पाटील,अनिल देशमुख,छगन भुजबळ या सहकार्यांसोबत दादांनी महाराष्ट्राचे राजकारण सामाजिक समतेच्या दिशेने पुढे नेले. त्यांच्या मनाला कधीही जातीयवादाने स्पर्श केला नाही. ते मुलत: पुरोगामी विचाराचे होते. अपघाती निधनापुर्वी त्यांनी राजकारणामध्ये ज्यांची साथ धरली होती त्यांना सोडून पुन्हा मुख्य प्रवाहात येण्याचे ठरवले होते. परंतु घात झाला. दादांच्या मृत्यूचे शल्य प्रत्येकाच्या मनात आहे. ज्यांनी कोणी हा घात केला असेल त्यांना शोधुन काढण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करण्याची गरज असल्याचे उषाताई म्हणाल्या. श्रीमती सुनेत्राताई पवार या सुध्दा पुरोगामी विचाराच्या असून भविष्यात महाराष्ट्राला सक्षम नेतृत्व देण्याची क्षमता त्यांच्यात आहे. त्यासाठी आपण सर्वजण सुनेत्राताईंच्या पाठीशी उभे राहू असेही ॲड.दराडे म्हणाल्या.

या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोक पत्रकार भागवत तावरे यांनी केले. विनोद मुळूक यांनी अध्यक्षीय समारोप करताना अजित दादांच्या अनेक आठवणी सांगितल्या. पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांनी व्याख्यान माला आयोजित करण्या मागची भूमिका विशद केली.निमा संघटनेचे अध्यक्ष डॉ.अजित जाधव यांनी आपल्या भाषणात अजित दादांच्या सहवासात आलेले अनुभव सांगितले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नितीन क्षीरसागर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रतिक कांबळे यांनी केले.भगवान विद्यालयातील विद्यार्थीनींनी या प्रसंगी सुश्राव्य गीत सादर केले.

## बलभीम महाविद्यालयात विद्यापीठाच्या रग्बी संघाचे प्रशिक्षण शिबिर



बीड । प्रतिनिधी

येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ.संतोष उंदरे यांच्या मार्गदर्शनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ रब्बी संघाच्या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबिरासाठी विविध महाविद्यालयाचे खेळाडू सहभागी झाले होते. अशा खेळाडूंना महाविद्यालयाच्या वतीने राहण्याची व जेवण्याची सोय करण्यात आली होती. या खेळाडूंना श्री. नितीन येळवे व जाकीर शेख खाटीक यांनी खेळाडूंना प्रशिक्षण दिले. हा संघ अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी जाणार आहे. या स्पर्धा दिनांक २ एप्रिल २०२६ रोजी भुवनेश्वर येथे संपन्न होणार आहे. हे शिबिर यशस्वितेसाठी क्रीडा विभागप्रमुख डॉ. जगन्नाथ तत्तापूरे व क्रीडा विभागातील प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.


### जाहीर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १७९ / २०२६**

CNR No. MHBI0200003072026

**काशिनाथ बाबू उर्फ बाबुराव जानवळे वि. निरंक**

अर्जदार :- **काशिनाथ पि. बाबु उर्फ बाबुराव जानवळे, वय-७७ वर्षे, धंदा-शेती, रा. यशोदा हॉटेल मागे, शिवाजीनगर, बार्शी रोड, बीड ता. जि. बीड**

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात बाबु उर्फ बाबुराव पि. गोविंद जानवळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत बाबु उर्फ बाबुराव पि. गोविंद जानवळे यांचा मृत्यु दिनांक ०७/०५/२००१ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हा मयताचा मुलगा आहे. तसेच मयताचे आई-वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत बाबु उर्फ बाबुराव पि. गोविंद जानवळे यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी. **प्रकरणातील पुढील तारीख १८/०४/२०२६**

आज दिनांक २४ माहे मार्च २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **(मार्फत ॲड. वाय. आर. शेळके)**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय व स्तर बीड**

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा.ये. वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३१६ / २०२६**

**किसनबाई जायभाये वि. निरंक**

यापेक्षा आश्रुबा बापुराव जायभाये, हे दिनांक १३/०९/२०२२ रोजी खंडाळा, ता.जि.बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार-

**१. किसनाबाई भ्र. आश्रुबा जायभाये, वय ७७ वर्षे, धंदा घरकाम, रा. खंडाळा, ता. जि. बीड. २. वसंत पि.आश्रुबा जायभाये, वय ४४ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. अशोक पि. आश्रुबा जायभाये, वय ४३ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे. ४. राजुबाई भ्र. सोपान घोळवे, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. गालेगांव रोड, एन. आर. सी. कॉलनी, कल्याण, ठाणे. ५. रेखा भ्र. आश्रुबा मिसाळ, रा. मिसाळवाडी, ता. पाटोदा, जि. बीड**

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क्र. ४ व ५ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत ना आश्रुबा बापुराव जायभाये, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २७/०४/२०२६ ही आहे.

आज दिनांक २५ मार्च २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **(ॲड. डी. एम. रोटे यांचे मार्फत)**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर बीड**

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा.ये. वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३०२ / २०२६**

**सुषमा चव्हाण वि. निरंक**

ज्यापेक्षा अशोक बाबासाहेब वरेकर, हे दिनांक ०३/०७/२०२१ रोजी कुटेवाडी, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार-

**१. सुषमा भ्र. रामराजे चव्हाण, वय. २९ वर्षे, धंदा. घरकाम, रा. कोल्हारवाडी, ता. जि. बीड. २. वैजयंती भ्र. रंजीत कुटे, वय ३४ वर्षे, धंदा. घरकाम, रा. कुटेवाडी, ता. जि.बीड**

अर्जदार क्र. १ व २ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत नामे अशोक बाबासाहेब वरेकर, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख २७/०४/२०२६ ही आहे.**

आज दिनांक २५ मार्च २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**(ॲड. डी. एम. रोटे यांचे मार्फत)**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर बीड**

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • रविवार दि. २९ मार्च २०२६ •

## थोडक्यात...

### जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

**बीड ।** प्रतिनिधी

बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत आगामी काळात विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक २६ मार्च २०२६ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. ९ एप्रिल २०२६ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्ल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

### भारताची जनगणना २०२७ अंतर्गत घर यादी कार्यक्रमासाठी तीन दिवसीय प्रशिक्षण संपत्र

**बीड ।** प्रतिनिधी

भारताची जनगणना २०२७ अंतर्गत घर यादी (Houselisting and housing Cena) कार्यक्रम हा प्रभावी अंमलबजावणीसाठी तहसीलदार व मुख्याधिकारी यांच्यासाठी द्वितीय टप्प्यातील तीन दिवसीय प्रशिक्षण सत्र दि. २३मार्च २०२६ ते २५ मार्च २०२६ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथील जिल्हा नियोजन समिती सभागृहात यशस्वीरीत्या पार पडले. या प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना त्यांनी नमूद केले की, निवडणुकांप्रमाणेच जनगणना ही देशाच्या भवितव्यासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून या माध्यमातून सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक घटकांचे अचूक मूल्यमापन केले जाते त्यामुळे ही प्रक्रिया वेळेत अचूक व नियोजनबद्ध पद्धतीने राबविणे आवश्यक आहे. घर यादी कार्यक्रम राबविताना प्रत्येक घर व प्रत्येक कुटुंबाची संपूर्ण व अचूक नोंद होईल याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले तसेच प्रगणकांनी नागरिकांशी सकारात्मक व समंजस संवाद साधून माहिती संकलनात लोकांचा सक्रिय सहभाग वाढवावा असेही त्यांनी सांगितले दहा वर्षांतून एकदा होणारी जनगणना ही देशाच्या विकासाचा भक्कम पाया ठरणारी प्रक्रिया असल्याने सर्व संबंधित यंत्रणांनी सज्ज राहून जबाबदारीने कार्य करावे, असे आवाहन करण्यात आले . यावेळी सर्व तहसीलदार जिल्हा बीड तसेच नगरपरिषद व नगरपंचायत मुख्याधिकारी यांनी समन्वयाने कार्य करताना उन्द्भवणाऱ्या तांत्रिक अडचणींचे त्वरित निराकरण करावे, असे निर्देश देण्यात आले. जनगणना ही देशसेवेची एक अत्यंत महत्वपूर्ण संधी असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. या प्रशिक्षणास बीड जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, (सा.प्र.) उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, जनगणना संचालनालय, मुंबई येथील रमेश भोसले व मिलिंद पाटील, तसेच सर्व तहसीलदार, मुख्यधिकारी व विविध विभागांतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### श्रीक्षेत्र संतकृपा हनुमान गड येथे रामनवमी निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता महंत अभिमन्यू महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली

**आष्टी ।** प्रतिनिधी

सप्ताहाच्या अखेरच्या दिवशी आयोजित कीर्तनात बोलताना महंत अभिमन्यू महाराज यांनी, संतांची संगत करा ; संगत चुकली की जीवनाची दुर्दशा होते, असा मोलाचा संदेश दिला. त्यांनी सांगितले की, श्रीक्षेत्र हनुमान गड हे संस्थान सर्वांसाठी खुले असून, हे गोरगरीब जनतेच्या तसेच ऊसतोड कामगारांच्या एक-एक रुपयातून उभे राहिलेले पवित्र स्थान आहे. यावेळी त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, गडाला दुर्लक्षित करण्याचा कितीही प्रयत्न झाला तरी हे हनुमानाचे स्थान असून भक्तांच्या श्रद्धेमुळे ते सदैव उभे राहील. गडाची स्थापना हरिभक्त परायण बुवासाहेब महाराज खाडे यांनी शून्यातून केली असून, या पवित्र स्थळावर कोणत्याही प्रकारचे गालबोट लागू नये, असे आवाहनही त्यांनी केले. महंतांनी काही समाजकंटक प्रवृत्तीच्या लोकांवर अप्रत्यक्ष टीका करत गडाची बदनामी थांबवण्याचे आवाहन केले. अल्प कालावधीत झालेला गडाचा विकास काहींना पाहवत नसल्यामुळे चुकीचे वक्तव्य केले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. हनुमान गड हा पृथ्वीवरील स्वर्ग आहे ; श्रद्धा, भक्ती आणि करुणेचे हे केंद्र आहे, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

---

## ना. पंकजाताई मुंडेंसह नाथऱ्यात लेकींच्या मांदियाळीत संपन्न झाला...

# श्रीमद् देवी भागवत कथा सप्ताह

### सन्मान आणि अभिमानाने सर्व लेकी एकत्र आल्या ; इथल्या मातीत मोठी शक्ती ; सांगता सोहळ्यात ना.पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केल्या भावना

**परळी ।** प्रतिनिधी



नाथऱ्याच्या मातीत मोठी शक्ती आहे. इथल्या मातीने विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे दिग्गज दिले आहेत. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यासारखा लोकनेता नाथऱ्याने देशाला दिला. नाथऱ्याच्या लेकी आज सन्मानाने आणि अभिमानाने एकत्र आल्या आहेत. अध्यात्माची गोडी वाढवणारा हा सोहळा लेकींनी आयोजित करून एकजुटीची भावना वाढीस लावली असल्याचे राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे सांगितले. नाथरा येथे विविध गावात सासरी गेलेल्या लेकींनी एकत्रित येऊन श्रीमद् देवी भागवत कथा सप्ताह आयोजित केला होता. कथेच्या सांगता सोहळ्यास ना. पंकजाताई मुंडे आणि आ. धनंजय मुंडे उपस्थित होते. याप्रसंगी स्वररत्न ह.भ.प अंजलीताई केंद्रे यांच्या सुमधुर वाणीतून काल्याचे कीर्तन संपन्न झाले, ना. पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्या सुश्राव्य कीर्तनाचे श्रवण करून उपस्थित भाविकांशी संवाद साधला. श्रीमद देवी कथेला लेकींचा विशेष मान असतो, आज कथेच्या निमित्ताने नाथऱ्याच्या लेकी सन्मानाने आणि अभिमानाने इथे एकत्र आल्या आहेत. लेकींचा सन्मान करण्याची आपली संस्कृती यानिमित्ताने वृद्धिंगत होईल, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी देखील चैत्र नवरात्रेनिमित्त कन्या पूजन करतात. मध्य प्रदेश मध्ये शिवराजसिंह चौहान अत्यंत आदरपूर्वक लेकींचे कन्या पूजन करतात, यातून लेकींचा सन्मान होतो असे पंकजाताई मुंडे म्हणाल्या. आज या कथेच्या माध्यमातून अत्यंत सुंदर सोहळा पार पडतो आहे. यानिमित्ताने मला सर्वांशी संवाद साधता आला. नाथऱ्याच्या मातीत मोठी शक्ती आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब, पंडित अण्णा मुंडे, धनंजय मुंडे,डॉ. प्रितमताई मुंडे यांच्यासारखे दिग्गज नेते आपल्या नाथऱ्याने दिले असल्याचे त्या म्हणाल्या. अध्यात्म आणि एकजुटीची भावना वाढीस लावणारा हा सोहळा होता, आयोजक लेकींचे मनापासून आभार मानत ना. पंकजाताई मुंडे यांनी सर्वांचे यश, कीर्ती आणि आरोग्यासाठी प्रार्थना करते म्हणतं त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. सांगता सोहळ्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी सर्व महिला भगिनींसोबत पंगतीत बसून महाप्रसादाचा लाभ घेतला.

---

### मेहनत,जिद्द, आणि चिकाटी मुळे माझ्या इट गावातील सर्व सामान्य कुटुंबातील युवक विकास दत्तात्रय डोईफोडे याने अवघ्या २० व्या वर्षी पोलीस झाला : गणपत डोईफोडे

## विकासच्या या यशाने अनेक युवकांना नवी दिशा मिळेल

**बीड ।** प्रतिनिधी




माझ्या इट या गावातील होतकरू युवक विकास दत्तात्रय डोईफोडे याने अवघ्या २० व्या वर्षी महाराष्ट्र पोलीस, अमरावती जिल्हा येथे निवड झाल्याने माझ्या इट गावाचे नाव उज्वल केले आहे. या अभिमानास्पद यशाबद्दल गावकऱ्यांच्या वतीने जिल्हा परिषद शाळा, इट येथे त्याचा तसेच त्याच्या आई-वडिलांचा सत्कार करून मनः पूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. या यशाची खास बाब म्हणजे त्याचे मोठे भाऊ बीड जिल्हा पोलीस मध्ये कार्यरत असून त्याची बहीण जालना जिल्हा पोलीस मध्ये सेवेत आहे. एकाच कुटुंबातील तिन्ही बहीण-भाऊ पोलीस दलात कार्यरत असल्यामुळे हा क्षण संपूर्ण गावासाठी अत्यंत अभिमानाचा आणि प्रेरणादायी ठरला आहे.

या प्रसंगी गणपत आप्पा डोईफोडे यांनी मनोगत केले.प्रसंगी माझे सहकारी गोरख बापू डोईफोडे, भारत नरनाळे, गुलाब नरनाळे, मोहन आप्पा डोईफोडे, शंकर कदम, बाबा तात्या डोईफोडे, पांडू तात्या डोईफोडे, कल्याण नरनाळे, गणेश नरनाळे, बलभीम गवळी, संजय डोईफोडे, सर्जेराव डोईफोडे, सुदाम भाऊ डोईया फोडे, रागु डोईफोडे, रामेश्वर डोईफोडे, श्रीराम डोईफोडे, बाबू डोईफोडे, विकास भोसले, बंटी डोईफोडे, अजित डोईफोडे, पवन डोईफोडे, सखाराम डोईफोडे, चंद्रकांत डोईफोडे, बिबिशेन डोईफोडे, बाळू क्षिरसागर तसेच सर्व युवक मित्र व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद व विद्यार्थी यांचीही उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

---

## मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम सुरु

**बीड ।** प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार भारतातील ९ राज्य व ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम सुरु करण्यात आलेला आहे. पुढील टप्यात महाराष्ट्रासह अन्य राज्यातही सदर कार्यक्रम लवकरच सुरु होणार आहे. विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने मा.मुख्य निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाकडुन प्राप्त निर्देशानुसार सदरच्या कार्यक्रमाची पूर्वतयारी आपल्या विभागात सुरु करण्यात आलेली आहे.आगामी विशेष सखोल पुनरिक्षणाच्या (Special Intensive Revision) अनुषंगाने प्रथमतः मॅपींगची कार्यवाही सेल्फ पध्दतीने मतदान केंद्रस्तरीय अधिकारी Table Top Activity द्वारे करुन घेणार असुन यामध्ये सन २००२ ची विशेष सखोल पुनरिक्षणाची अंतिम मतदार यादी, सन २०२४ घ्या सार्वत्रिक निवडणूकीच्या अंतिम मतदार यादीसह मॅप करुन, मॅपींगची कार्यवाही पुर्ण करणार आहे. नंतर Top Activity Ûmao Self पध्दतीने (One-to-One) प्राप्त न होणाऱ्या नोंदी संदर्भात Progeny Mapping कार्यपध्दती अवलंबून मॅपींग करावयाची आहे यामध्ये सन २०२४ च्या सार्वत्रिक निवडणूकीच्या अंतिम मतदार यादीतील ज्यांची नावे सन २००२ च्या विशेष सखोल पुनरिक्षण अंतिम मतदार यादीमध्ये उपलब्ध नसतील, अशा मतदारांचे मॅपींग त्यांचे आई/वडील किंवा आजी/आजोबा यांची नावे सन २००२ च्या विशेष सखोल पुनरिक्षण अंतिम मतदारयादीमध्ये शोधुन त्याप्रमाणे नोंदी घेऊन Progeny Mapping पुर्ण करणार आहे. या पध्दतीने मॅपींग केल्यानंतर, सन २०२४ च्या सार्वत्रिक निवडणूकांच्या अंतिम मतदार यादीतील शिल्लक राहिलेल्या Unmapped मतदारांचे मॅपींग करण्याच्या दृष्टीने संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी हे संबंधित मतदारांच्या निवासाचा पत्यावर जाऊन ते स्वतः किंवा त्यांचे आई-वडिल / आजी-आजोबा यांचे सन २००२ च्या विशेष सखोल पुनरिक्षण अंतिम मतदार यादीमधील माहिती जाणून घेऊन त्या माहितीच्या आधारे भारत निवडणूक आयोगाच्या मतदार सेवा पोर्टलवर (https://voters.eci.gov.in/) भेट देऊन त्याद्वारे Unmapped मतदारांचे Mapping करणार आहे. तसेच अस्पष्ट व मानवी नसलेल्या छायाचित्राची पडताळणी व DSE ( demographic similar entries ) च्या अनुषंगाने पडताळणी व वगळणी बाबतची कार्यवाही मतदान केंद्रस्तरीय अधिकारी करणार आहेत. मा.विभागीय आयुक्त संभाजीनगर यांनी याबाबत विभागातील सर्व जिल्हाधिकारी, आयुक्त महानगरपालीका व क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी यांची दिनांक २३.०३.२०२६ रोजी बैठक घेडुन कामकाजाचा आढावा घेतला व मार्गदर्शन केले. करीता या राष्ट्रीय कामासाठी मतदार केंद्रनिहाय नियुक्त केलेले BLO (मतदान केंद्रस्तरीय अधिकारी)यांना आवश्यक ते सहकार्य नागरीकांनी करावे असे अवाहन मतदार यादी निरिक्षक तथा विभागीय आयुक्त श्री. जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

---

## राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष पद संगीताताई चव्हाण यांना द्या: बीड जिल्ह्यातील जनतेकडून होत आहे मागणी

**वडवणी ।** प्रतिनिधी



राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी बीड जिल्ह्यातील बंजारा समाजाची लेक असलेल्या संगीताताई चव्हाण यांचीच नेमणूक करावी, अशी मागणी बीड जिल्ह्यातील लाडक्या बहिणींसह सर्वसामान्य लोकांकडून होत आहे. संगीताताई चव्हाण या सध्या महिला आयोगाच्या सदस्य असल्यामुळे आणि सर्वसामान्य परिवारातून आल्या असल्यामुळे त्यांना महिलांच्या समस्यांची जाणीव आहे. आयोगावर काम करण्याचा अभ्यास आहे, त्यामुळे त्यांनाच ही संधी मिळावी, असा आग्रह आता होऊ लागला आहे.

राज्यातील खरात प्रकरणामुळे विद्यमान अध्यक्ष रूपालीताई चाकणकर यांनी राजीनामा दिला आहे. त्यांच्या राजीनाम्यामुळे या ठिकाणी आता पुढे कोणाची वर्णी लागेल, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. सर्वसामान्य महिलांचे प्रश्न आणि सर्वसामान्य महिलांचे जीवन ज्या महिलेला माहित आहे, महिलांचे होणारे शोषण दूर करण्याची धमक असलेली महिला, बीड सारख्या ग्रामीण भागातून एका तांड्यावरील बंजारा समाजाची असलेली लेक संगीताताई चव्हाण या एक सक्षम महिला आहेत. मागील अनेक वर्षांपासून त्यांनी सामाजिक क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी केलेली आहे. स्वतः तांड्यावर राहिलेल्या असल्यामुळे त्यांना महिलांच्या समस्यांची जाणीव आहे. वाड्यावस्त्या, तांड्यावर जाऊन त्या महिलांचे प्रश्न सोडवू शकतात, गोरगरीब महिलांना न्याय मिळवून देऊ शकतात आणि महिलांचे होणारे शोषण रोखू शकतात, याची जाणीव असल्यामुळे महाराष्ट्रातील समस्त लाडक्या बहिणीकडून संगीताताई चव्हाण यांच्या नावाला पाठिंबा मिळत आहे.

संगीताताई चव्हाण यांनाच महिला आयोगाचे अध्यक्षपद देण्यात यावे, अशी मागणी वडवणी तालुक्यातील आणि बीड जिल्ह्यातील महिलांनी केली आहे. संगीताताई चव्हाण या शिवसेनेच्या नेत्या आहेत, त्यामुळे महिला आयोगाचे पद हे नेमके कोणाच्या वाट्याला जाते, याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. दरम्यान, संगीताताई चव्हाण यांची निवड व्हावी यासाठी गावागावातील कार्यकर्त्यांनी मागणीचा जोर लावला आहे.

**● बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी बॅनर लावून मागणी**

**संगीताताई चव्हाण यांची महिला आयोगाच्या अध्यक्षपदी निवड करावी, या मागणीचे फलक बीड शहर आणि जिल्ह्याच्या विविध कानाकोपऱ्यात रस्त्याच्या कडेला, चौकाचौकात लावलेले दिसून येत आहेत. हे फलक बीड जिल्ह्यातील लाडक्या बहिणींनी लावले असल्याचे सांगण्यात येत आहे. बीड जिल्ह्यातील युवा कार्यकर्ते तुकाराम गायकवाड, शेख समीर, बाबासाहेब राऊत, माजी सरपंच मिलु भाई, अशोक आडे, शेख फर्जना, प्रतिभा गणोरकर, शीला शिरसाट, रेखा भालशंकर, सुनिता जाधव, पूजा धोंडे, शीला सावंत, शांता राठोड, रेखा वाघमारे, यशोदा राठोड, मंगल राठोड, मीरा आडे, संजीवनी आडे, मनीषा पवार, कांचन गनोरकर, कांचन मोरे, नुजत काजी, मधुमती शेजुळ, शारदा डोईजड, जया राऊत आदी कार्यकर्त्यांनी मागणी लावून धरली आहे.**